# अकस्मात मृत्युचा फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १७४ अन्वये तपास

पोलीस निरीक्षक,
श्रीमती माणिक पत्की
गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक

# अकस्मात मृत्युचे प्रकार

१. गळफास घेवुन मृत्यु
२. पाण्यात बुडुन मृत्यु
३. विषबाधा / विषप्रयोगाने मृत्यु
४. भाजुन / पोळुन मृत्यु
५. गुदमरून मृत्यु
६. उपासमारीने मृत्यु
७. थंडीमुळे मृत्यु
८. विज अंगावर पडुन मृत्यु
९. उष्मघाताने मृत्यु

# अकस्मात मृत्युची नोंद घेण्यापुर्वी व नंतर तपास करतांना तसेच खबर दाखल करातांना विचारात घ्यावयाचे महत्वाचे मुदे

- अकस्मात मृत्युची खबर मिळताच घटनास्थळ संरक्षित करण्यासाठी पोलीस अंमलदाराची रवानगी करावी व त्याबाबत स्टेशन डायरीला नोंद घ्यावी.
- अनोळखी मृतदेह असल्यास खबरी मध्ये बाहय वर्णन घ्यावे.
- मयताचे घटनेबाबत सविस्तर व मुदेसुद वर्णन, मयताचे नांव, वय, पत्ता, मयताचे मरणाचे कारण घ्यावे.
- मयताचा मृत्यु केव्हा झाला. कोणी पाहीले. पाहील्याचे वेळ व तारीख याचा खबरी मध्ये उल्लेख घ्यावा.
- अकस्मात मृत्युच्या घटनास्थळाचे वर्णन घ्यावे. उदा. रेल्वेत, सार्वजनिक ठिकाणी, घरात, संडास, बाथरूम, झाडावर, नदीत, पुलावर, पुलाखाली, शेतात, तलावात, कालव्यात, विहीरीत, कारखान्यात, कार्यालयात, दवाखान्यात, रेल्वे रूळावार, गटारात, नाल्यात, खाडीत, समुद्रकिनारी, गोडावुनमध्ये, किंवा इतर ठिकाणी व परिस्थीत
- मयताच्या अंगावरील जखमा (खबर देणा-या इसमास माहित असल्यास) असल्यास त्याचा उल्लेख खबरी मध्ये करावा

# अकस्मात मृत्युची नोंद घेण्यापुर्वी व नंतर तपास करतांना तसेच खबर दाखल करातांना विचारात घ्यावयाचे महत्वाचे मुदे

- मयतास मृत्यु कशामुळे आला याचा उल्लेख खबरीमध्ये करावा. उदा. आत्महत्या, एखाद्या जनावराने अथवा इसमाने मारले, सर्पदंश, अपघाताने,विषारी द्रव्य/पदार्थ/घटक खाल्याने किंवा विषारी वायु / वासाच्या संपर्कात आल्याने, झाडावरून अथव उंच जागेवरून पडल्याने, पाण्यात बुडाल्याने अथवा पाण्यात आत्महत्या करण्याचे उदेशाने उडी मारल्याने, विजेचा शॉक लागुन अथवा विज अंगावर पडल्याने, गळफास दिल्याने / घेतल्याने किंवा लागल्याने, गुदमरून, आजाराने, उपासमारीने, उष्मघाताने, थंडीने, गर्भपात केल्यने इत्यादी कारणावरून किंवा माहित नसल्यास तसा उल्लेख खबरीमध्ये करावा
- विवाहीत स्त्री मयताची खबर घेतांना खालील गोष्टींचा विचारपुस करून उल्लेख करावा.
- १. तिने विवाहापासुन ७ वर्षाचे आत आत्महत्या केली आहे का? इतर इसमाने तिचे बाबततीत अपराध केल्याचा संशय आहे का?
- २. विवाहापासुन ७ वर्षाचे आत मरण आले आहे का ? तिचे मरणाबात नातेवाईकांना संशय आहे का.

# अकस्मात मृत्युची नोंद घेण्यापुर्वी व नंतर तपास करतांना तसेच खबर दाखल करातांना विचारात घ्यावयाचे महत्वाचे मुदे

- ३. मयत स्त्री ही विवाहीत असुन ती ३० वर्ष वयाचे आतील आहे का?
- वरील अ.नं १ ते ३ बाबत मयत दाखल केल्यानंतर तात्काळ वरीष्ठ पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी यांना खासवर्दी अहवाल (स्पेशल रिपोर्ट) पाठवावा
- मिळालेल्या प्रथम खबरी वरून तात्काळ स्टेशनडायरी व संगणकीय प्रणालीमध्ये नोंद घ्यावी व प्रथम खबरीची प्रत मा. कार्यकारी दंडाधिकारी यांना पाठविण्यात यावी (मा. कार्यकारी दंडाधिकारी यांना सर्व प्रकारच्या अकस्मात मृत्युचा खबरी अहवाल पाठविणे गरजेचे आहे.)
- खबर मिळण्यास विलंब झाल्यास त्याचे सविस्तर कारण खबरीमध्ये नमुद करावे.
- खबर घेतांना दुभाषी वापरून घेतलेली खबर, खबर देणा-या व्यक्तीस वाचुन दाखवुन त्यावर त्यांची सही घ्यावी.

# अकस्मात मृत्युचा प्रकार व लक्षणे

१. **गळफास / Hanging :-** एखादी दोरी किंवा दोरी सदृष्य कोणत्याही वस्तुचा फास तयार करून तो गळयात अडकविल्यानंतर उंच ठिकाणाहुन शरीर झोकुन दिल्यामुळे शरिराच्या वजनाने फास आवळला जावुन श्वसन यंत्रणेवर मंज्जसंस्थेवर दाब पडुन मृत्यु घडुन येतो त्यास गळफास असे म्हणतात

लक्षणे :-

- **मयताच्या मानेवर**, गळयाभोवती दोरी / रस्सी वगैरेच्या खुणा असतात
- **डोळे** :- बाहेर आलेले असतात. डोळयांच्या बाहुल्या प्रसरण पावलेल्या असतात.
- **जीभ** :- तोंडाबाहेर आलेली / दोन्ही दातांमध्ये अडकेलेल / दातांच्या पाठमागुन चिकटलेलेली असते.
- **लाळ** :- तोंडाच्या एका कोप-यातुन येवुन छातीवर उभ्या सरळ रेषेत लाळेची खुण निर्माण झालेली असते.
- **पुरूषा बाबत** :- अंडकोष सुजलेला, शिश्न ताट झालेले किंवा विर्य पतन झालेले अढळुन येते.
- लघवी अथवा शौचास झालेले अढळुन येते.

# अकस्मात मृत्युचा प्रकार व लक्षणे

## १. गळफास / **Hanging**

लक्षणे :-

- **गाठ :-** दोरी / वायर / रस्सी यांचा गाठीचा व्रण गळयाव उजव्या किंवा डाव्या बाजुस दिसते
- **जखमा :-** गंभीर किंवा विस्तृत प्रमाणात जखमा अढळुन येत नाहीत. झटापटीची चिन्हे नसतात.
- प्रेत बंद ठिकाणी मिळुन आल्यास दरवाजा आतुन बंद केलल्या स्थितीत अढळुन येईल.
- हात पाय खुले असतात. बांधलेले नसतात.
- पायाखाली डबा, स्टुल, खुर्ची इत्यादी टेपा म्हणुन वापरून ढकलुन दिलेल्या वस्तु असतात.
- वरील नमुद लक्षणाबाबत संशय आल्यास तो अन्यघाती गळफास / खुन समजण्यात यावा.
- गळफास मृत्यु मध्ये लहानमुलांकडुन तुरूंगातील / सिनेमातील गळफासाच्या देखाव्याची नक्कल / अतीउत्साही व्यक्तीकडुन सार्वजनिक ठिकाणी गळफासाचे दृश्य निर्माण करतांना मृत्यु आल्यास या कृतीला अपघाती मृत्यु संबोधता येईल.

# अकस्मात मृत्युचे प्रकार व लक्षणे

२. **पाण्यात बुडून मृत्यु / Drawning** :- शरीर पाण्यात किंवा कोणत्याही द्रवात बुडाल्यामुळे वातावरणातील ऑक्सीजनयुक्त हवा फुप्फसापर्यंत जावु न शकल्याने जो मृत्यु घडुन येतो त्याला बुडॅन मृत्यु आला असे म्हणतात. (संपुर्ण शरीर बुडालेले पाहिजे असे नाही. केवळ चेहरा पाण्यात बुडाला तरी सुध्दा बुडून मृत्यु येणे अटळ असते.)

लक्षणे :-

- चेहरा :- फिकट पडलेला असतो.
- **कपडे** :- अंगावरील कपडे भिजलेले / ओले असतात.
- **डोळे** :- अर्धवट मिळलेले / उघउलेली असतील, बाहुल्या प्रसरण पावलेल्या व डोळे रक्तसंचयुक्त असु शकतील
- **जीभ** :- बाहेर आलेली व सुजलेली असते.
- **नक तोंड** :- नाकातोंडावाटे साबणाच्या फेसा सारखा फेस गोळा झालेला असतो. रक्तसंचययुक्त असु शकेल.
- **हात** :- हातात चिखल, वाळु, शेवाळ, पाणी, जल वनस्पतीचे अवशेष घट्ट पकडुन ठेवलेलीस असतात.

# अकस्मात मृत्युचे प्रकार व लक्षणे

## २. पाण्यात बुडून मृत्यु / Drawning :-

लक्षणे :-

- **त्वचा** :- दाणेदार काटेरी, शहारे आल्यासारखी असते.
- **पुरूष** :- अंडकोष अंकुचन पावलेले व शिन्स आत ओढलेले असते.
- **स्त्री** :- स्तनाग्रे आत ओढलेली असतात.
- **नखे** :- हातापायांचे नखात चिखल किंवा वाळुचे कण आढळुन येतील.
- **बोटे** :- हातापायाची बोटे खरचटलेली दिसुन येतील.
- **तळहात पाय व त्वचा** :- पांढरी सुरकुतलेली व ओलसर दिसते.
- **शरीर** :- पाण्यात पालथ्या अवस्थेत असेल,
- हात पाय बांधलेल्या अवस्थेत मिळुन आल्यास बांधण्याचे प्रकारावार स्वता अथवा दुस-याने बांधले आहेत काय याचा अवलोकनावरून तर्क लावावा
- वरील लक्षणामध्ये तफावत अढळुन आल्यास इतर घात किंवा खुन समजावा.

# अकस्मात मृत्युचे प्रकार व लक्षणे

**३. विषबाधा / विषप्रयोगाने मृत्यु/ Poisoning** :- एखादा कोणताही पदार्थ जो एखाद्या निरेगी व्यक्तीस दिल्यामुळे / पाजल्यामुळे किंवा त्यांचे शरीरास लागल्यास व त्याचे पोटात गेल्याने त्या भागाचा नाश करतो. आजार आणतो व मृत्यु आणण्यास कारणीभुत होतो.)

लक्षणे :-

- **शरीर** :- शरीरावर त्वचा निळसर काळसर असते.
- **तोंड** :- तोंडातुन पांढरा निळसर फेस येतो.
- **लाळ** :- लाळ बाहेर आल्यावर ज्या भागावर ओघळलेली असेल तेथील त्वचा भाजल्यासारखी असते.
- **नखे** :- काळसर पडलेली असतात.
- **ओठ** :- निळसर व काळे व सुचलेले असतात.
- **डोळे** :- वटारल्यासारखे दिसतात. बाहुल्या विस्फारलेल्या किंवा अंकुचीत असतात.
- **जिभ** :- काळी भाजल्यासारखी दिसते.
- **वास** :- विषारी पदार्थाच उग्र वास येतो.

# अकस्मात मृत्युचे प्रकार व लक्षणे

## ३. विषबाधा / विषप्रयोगाने मृत्यु/ **Poisoning** :-

लक्षणे :-

- **दात :-** निळसर पडलेले असतात.
- **स्नायु :-** मरणोत्तर ताठरता आलेली असते.
- **बोटे :-** हातापायाची बोटे खरचटलेली दिसुन येतील.
- **तळहात पाय व त्वचा :-** पांढरी सुरकुतलेली व ओलसर दिसते.

# अकस्मात मृत्युचे प्रकार व लक्षणे

४. भाजुन/पोळुन मृत्यु **Burning** :- ज्वलनशिल द्रव्य पदार्थ, वायु, किंवा मानवनिर्मीत / शॉकसर्कीट अथवा नैसर्गिक आग या कारणांमुळे येणारा मृत्यु

लक्षणे :-

- **त्वचा**:- त्वचेवर नियीमत व अनियीमत कडा असलेल्या भेगा पडतात, केस होरपळून गेल्याने त्वचा काळी पडलेली अढळते.
- **डोके**:- कवटी फुटून त्या मधुन मेंदु बाहेर आलेला असु शकतो.
- **कमरेखालचा भाग** :- कमरे मधुन वाकलेला असता.
- हात :- कोपरामधुन वाकलेले / दुमडलेले असतात. हाताच्या मुठी आवळलेल्या व छातीसमोर धरलेल्या अवस्थेत असतात.
- त्वचा,स्नायु किंवा हाडे जळुन नष्ट झालेली असतात.
- शरीराच्या भाजलेल्या भागावर लालसरपणा असतात.
- भाजलेल्या ठिकाणी फोड निर्माण होतात ते फोडुन पाहील्यास रक्त येते.
- शरीरावर रॉकेल, पेट्रोल डिझल किंवा इतर ज्वलनशिल केमीकल वगैरेचा वास येत असतो. या पदार्थामुळे शरीर फार लवकर जळते व ते ळणे मोठे व गंभीर स्वरूपाचे आढळते.

# तपासाबाबतच्या सुचना

## ४. भाजुन/पोळुन मृत्यु Burning :-

- **घटनास्थळ निरीक्षण व पंचनामा** :- स्टोव्ह, रॉकेलचे कॅन, गॅस सिलेंडर, धातुचे तुकडे, बंदुकीची / सुरूंगाची दारु(बारूद) केमीकरल इत्यादी वस्तु मिळतात का ते पहावे.
- चुल पेटवितांना भडका उडाल्यास दिवा, कंदील पेटवितांना भडका होवुन भाजल्यास घटनास्थळावर काडीपेटी, रॉकेलचा दिवा, चिमणी, डबा, कॅन जप्त करावे.
- औद्योगिक क्षेत्रामध्ये / परीसरात ॲसिड पडुन स्फोट होवून, इंतिनचे गरम तेल किंवा गरम पाणी पडुन अपघाता होतात त्या ठिकाणचे परिस्थीती प्रमाणे पंचनाम्यात उल्लेख करावा.
- आगीमुळे मयताचे शरीराबरोबर आजुबाजुचा भाग जळालेलचा खुणा, निशाण्या, अर्धवट अथवा पुर्ण जळालेल्या अशा दिसुन येतील त्याचाही उल्लेख करावा.

# अकस्मात मृत्युचे प्रकार व लक्षणे

५. गुदमरून मृत्यु / **Suffocation :-** गळयावर कोणत्याही प्रकारचा दाब न देता किंवा न पडता वातावरणातील हवा फुफ्फसापर्यंत न जाउ शकल्यामुळे जो मृत्यु घडुन येतो त्याला गुदमरून मृत्यु होय

लक्षणे :-

- श्वसन मार्गात बाहेरील एखादी वस्तु. उदा मासांचा तुकाडा, बटाटयाची साल, नाणे, बटणे, फळांची बी, कृत्रिम दात, फुग्याचा तुकडा, काचेची गोळी इ. अडकली काय ते पहावे.
- अपघातामध्ये वाळुचे ढिगाराखाली, सिमेंट पीठ इत्यादी नाकातोंडात गेले आहे का ते पहावे.
- पळापळीमध्ये छातीवर दाब बडुन (धार्मीक कार्यक्रमात, समारंभात भितीमुळे) मृत्यु आला आहे का याची खात्री करावी. ƀ
- ओठाचे आतील बाजु फाटलेली अढळुन येईल.
- दोन्ही नाकपुडीच्या मधील पडद्याचा भंग झालेला अढळुन येईल.
- दोन्ही बाजुच्या बरगडया तुटलेल्या असतील.

# अकस्मात मृत्युचे प्रकार व लक्षणे

६. उपासमारीने मृत्यु/ **Starvation :-** एखाद्या व्यक्तीला तिला आवश्यक असणारा अन्न पुरवठा सतत व नियमीतपणे बंद केला गेल्यास कालांतराने मृत्यु घडुन येतो त्यास उपासमारीने मृत्यु असे म्हणतात

लक्षणे :-

- **पोट** :- खोल गेलेले असते.
- **हात पाय** :- कृश झालेले असतात / शरीर अत्यंत थकलेले असते.
- **डोळे** :- डोळयाच्या बाहुल्या प्रसरण पावलेल्या असतात व उघडले, खोल गेलेले असतात.
- **त्वचा** :- कोरडी, खडबडीत सुकतलेली व अवयवांपासुन सटलेली (सैल पडलेली, लोबकाळणरी ) अशी दिसुन येते.
- **त्वचेतुन शरीरातुन दुर्गंधी** (आंबुस वास) येवु लागते.
- **जननेंदीय** :- सुकलेली असतात.
- **जिभ** :- कोरडी, बुरशी असलेली असते.

# अकस्मात मृत्युचे प्रकार व लक्षणे

७. थंडीमुळे मृत्यु/ **Death of cold :-** शरीराच्या नेहमीच्या तापमानापेक्षा अतिशय कमी तापमानाच्या वातावरणात राहिल्यास जो मृत्यु येतो व होतो त्यास थंडीमुळे मृत्यु असे म्हणता येईल

लक्षणे :-

- त्वचेवर फिकट लालसर रंगाचे किंवा निळसर असे डाग किंवा चट्टे अढळुन येतात. (Frodt Bites/ Chiliblains) असे म्हणतात.
- ते साधारण ओठ, नाक कान व हातापायांची बोटे यावर दिसत असतात.
- मरणोत्तर ताठरता उशीरा येवुन जास्तवेळ टिकते.

# अकस्मात मृत्युचे प्रकार व लक्षणे

## ८. विज अंगावर पडुन मृत्यु/ **Dew to lightning:-**

लक्षणे :-

- शरीरावर सर्व प्रकारच्या भाजल्याच्या जखमा असतात.
- सर्व प्रकारचे अस्थिभंग होतात.
- शरीरावरील सर्व केस जळुन जातात.
- शरीराचा एखादा अवयव जळुन कोळसा होतो.
- भाजल्यामुळे मोठे मोठे फोड येतील आणि त्वचेवर झााडांच्या फांदी प्रमाणे तपकीरी रंगाच्या खुणा निर्माण होतील.
- ज्या ठिकाणी विज शरीरात शिरते व ज्या ठिकाणाहुन बाहेर पडते त्या ठिकाणचे कपडे फाटलेले असता.
- चप्पर किंवा बुट असल्यास ते जळुन जातात किंवा त्याचे तुकडे - तुकडे होतात.
- म्यताजवळ काचेच्या / धातुच्या वस्तु असल्यास वितळुन जातात.
- स्टीलच्या वस्तुत चुंबकत्व येत असते व त्या वस्तुंचा ठसा त्वचेवर उमटलेला असतो.

# अकस्मात मृत्युचे प्रकार व लक्षणे

**९. उष्मघाताने मृत्यु/ Heat / Sun Stroke :- मेंदुमधील तापमान नियंत्रण करणारे केंद्र बंद पडल्यामुळे मृत्यु होतो**

लक्षणे :-

- मरणोत्तर ताठरपणा लवकर होवुन लवकरच नाहीसा होतो.
- त्वचेवर लालसर, निळसर असे ठिपके दिसुन येतात.
- सडण्याची, कुजण्याची प्रक्रिया लवकर होते.

# इन्कवेस्ट पंचनामा करतांना लक्षात घ्यावच्यया बाबी

- इन्कवेस्ट पंचनामा मृतदेह मिळालेल्या ठिकाणीच करावा.
- दोन अब्रुदार पंचना मरणोत्तर पंचनाम्यासाठी हजर ठेवावे. सराईत पंच घेवु नयेत.
- प्रेताची ओळख त्यास ओळखाणरे नातेवाईकांकडुन / दाखविण्यारे इसमांकडुन करवुन घेवुन त्यांचे नांव मरणोत्तर पंचनाम्यात घ्यावे.
- स्त्रि मयताचे बाबतीत दोन्ही पंचामध्ये एकतरी स्त्री पंच असणे आवश्यक आहे.
- स्त्रि मयताचे गुप्तअंगाची तपासणी स्त्री पंच किंवा महिला पोलीस अंमलदाराकडुन करून घ्यावी.
- प्रेताची उलटसुलट दोन्ही बाजुने अत्यंत बारकाईने व काळजी पुर्वक सर्वांगाची तपासणी करून त्यावरील अढळणा-या जखमा, केस, मोडलेली हाडे, मुक्कामार, खरचटलेल्या, ठेचलेल्या व इतर प्रकारच्या इजा / जखमा झाल्याच्या ज्या इतर खुणा दिसुन येतील त्याची सविस्तर नोंद घ्यावी.
- प्रेताची अवस्था व स्थिती यांचे वर्णन करावे. (दिशा / उताणे अथवा पालथे)

# इन्कवेस्ट पंचनामा करतांना लक्षात घ्यावच्यया बाबी

- अंगावरील कपडे घालण्याची पध्दत, नेसत्या कपडयांचा रंग किंवा विशेष लक्षणे, दागीने व इतर वस्तु यांची सविस्तर माहितीची नोंद घ्यावी
- जखमांचे ठिकाणी संख्या, स्वरूप, आकार, लांबी, रूंदी, खोली, त्यातुन रक्त वाहत होते अगर कसे? याचे वर्णन घ्यावे.
- प्रेताचे अंगावर वैशिष्टयपुर्ण खुणा (गोंदलेले,व्यंग, जुन्या / नविन मारहाणीच्या जखमा, अस्थी भंग इत्यादी ) असल्याची खात्री करून नोंदी घ्याव्यात
- जखमांचे अवस्थेवरून संभाव्य हत्यार कोणते असावे या बाबत नोंद घ्यावी.
- मृत शरीरावर मुंग्या किंवा किडे होत काय? याचा सविस्तर उल्लेख करावा.
- चिखल / माती लागली असले तर स्वच्छ करून तेथे जखम आहे काय पहावे
- प्रेताचे अवयवाची म्हणजे हात, पाय, कान, नाक, डोळे, जीभ, गळा, छाती, पोट, पाठ, गुप्तभाग याची स्थिती नमुद करावी.
- फास लावलेल्या, विषबाधा, गळा दाबुन मृत्यु इत्यादी बाबतीत मरणाचे दिसणा-या विशेष लक्षणांची  नोंद घ्यावी.

# इन्कवेस्ट पंचनामा करतांना लक्षात घ्यावच्यया बाबी

- दातांच्या बाबतीत नकली दात /चांदी /सोन्याची /कवळी यांचा उल्लेख करावा.
- प्रेताचे अंगावरील कपडे काढुन तपासणी करावी. त्या बाबत हलगर्जीपणा अथवा लज्जा बाळगु नये
- मयताचे विविध कोनातुन फोटा काढावे.
- पंचनाम्यात वैद्यकीय शब्दांचा किंवा परीभाषांचा वापर करू नये.
- शेवटी पंचाचे व पोलीसांचे मयताचे मरणाबाबतचे अंदाजीत अथवा निश्चित मत व्यक्त करून प्रेत शवविच्छेदनाकरीता पाठवावे.
- पंचनामा कशाचे प्रकाशात केला यांचा उल्लेख करावा.
- प्रेत शवविच्छेदनाकरीता कोणत्या अंमलदाराच्या ताब्यात दिले त्याचे नावाचा उल्लेख पंचनाम्यात करावा.
- पंचनामा सुरू केल्याची व संपल्याची वेळ घालुन दोन्ही पंचाच्या व तपासिक अंमलदाराची सही शेवटी घ्यावी.

# इन्कवेस्ट पंचनाम्यानंतर करावयाची करावाई

- मरणोत्तर पोलीस चौकशी अहवाल फार्म तयार करावा.
- वैद्यकीय अधिकारी यांना शवविच्छेदनाकरीता पत तयार करून त्यात मयताचे मरणाचे प्रकारावरून / संशयीत मृत्यु बाबत वैद्यकीय अधिकारी यांना व्हिसेरा राखुन ठेवण्याची विनंती करावी.
- अनोळखी मृतदेहाचे बाबतीत डि.एन.ए. तपासणी करीता नमुना राखुन ठेवण्याची विनंती वैद्यकीय अधिकारी यांना करावी.
- प्रेत शवविच्छेदनाचे अधिकार असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांचे कडे घेवुन जाणेसाठी नियुक्त केलेल्या अंमलदारास प्रेत घेवुन जाण्याचा आदेश देवुन त्यांचे ताब्यात प्रेत, इंन्कवेस्ट पंचनामा, शवविच्छेदनाबाबचते पत्र, मरणोत्तर पोलीस चौकशी अहवाल द्यावा.
- प्रेत घेवुन जाणारे अंमलदाराने शवविच्छेदना नंतर प्रेत वारसांचे ताब्यात देवुन प्रेत ताब्यात दिल्याच्या पावतीवर नातेवाईकांची / वारसांची सही घ्यावी.
- अनोळखी अथवा संशयीत मयताचे बाबतीत कपडे ताब्यात घेवुन ते पोलीस ठाण्यात जामा करावे.
- शवविच्छेदना करीता प्रेत घेवुन जाणारे अंमलदाराने मयताचे कपडे / चिजवस्तु पोलीस ठाण्यात जमा केल्यानंतर ठाणे अंमलदार / तपासी अंमलदार यांनी त्याचा जप्ती पंचनामा करावा व त्याची नोंद स्टेशनडायरीत घ्यावी.

# इन्कवेस्ट पंचनाम्यानंतर करावयाची करावाई

- प्रेत वारसाच्या ताब्यात दिल्याची पावती व वैद्यकीय अधिकारी यांचे कडुन प्राप्त झालेले मयताचे मरणाबाबतचे अगावु प्रमाणत्र तसेच शवविच्छेदनाचा अहवाल तपासाचे कागदपत्रात सामील करावा.
- जप्त मुदेमालाची नोंद संगणकीय कार्यप्रणालीत करून मुदेमाल पावती फाडावी
- वैद्यकीय अधिकारी यांनी व्हिसेरा राखुन ठेवलेला असल्यास तो सिलबंद करून त्यावर सहया असलेले लेबल लावुन तो तपासणी करीता न्यायसहायक प्रयोगशाळेत पोलीस अंमलदाराचे हस्ते पाठवा. सिए तपासणी पत्रात व्हिसेरा घेवुन जाणारे अंमलदाराचे नाव नमुद करावे.
- मयताचे निश्चीत कारण शोधणेसाठी आजुबाजुचे ठिकाणी निरीक्षण करावे.

# घटनास्थळाचे पंचनाम्याचे वेळी लक्षात घ्यायाचे मुदे

- जागेची परिस्थीत पडताळावी ( उदा. घरात, खोलीत प्रेत असेल तर त्याचा दररवाजा आतुन किंवा बाहेरून बंद होता काय ते पहावे.)
- प्रेताजवळ सापडलेली हत्यारे, बंदुकीच्या गोळया, विष, कपडे, जोडे, किंवा इतर वस्तु मिळाल्यास वर्णन घ्यावे.
- विशिष्ट केस मध्ये इतर खुणा, रक्त, पायाचे ठसे, दिसल्यास त्याचे वर्णन घ्यावे.
- **अनोळखी प्रेताबाबत :-**

१) विविध कोानातुन फोटो घ्यावे

२ ) जवळील वस्तु कपडे जप्त करून जतन करावेत.

३ ) फिंगर प्रिन्ट ऑपरेटरकडुन बोटांचे ठसे घ्यावेत. (प्रेत सडले असल्यसा डॉक्टरांना बोटाची कातडी योग्य रित्या राखणेस सांगणे)

४ ) चेहरा व अंगावरील विशेष व सर्व ओळखण्याच्या खुना याची नोंद करावी.

५ ) दातात सोने अगर चांदी भरलेली आहे अगर कवळी बसविलेली आहे काय ते पाहवे.

६ ) हरविलेलया इसमांचे वर्णन हे मयताचे वर्णनाशी मिळते जुळते आहे काय ते पहावे.

७ ) कपडयावरील टेलर मार्क / धोबी मार्क याचे वरून प्रेत ओळखण्याचा प्रयत्न करावा.

# घटनास्थळाचे पंचनाम्याचे वेळी लक्षात घ्यायाचे मुदे

८ ) दवंडी - स्थानिक वृत्तपत्र, आकाशवाणी, दरदर्शन, तपासयाद्या वायरलेस संदेश, इ-मेल फोन संदेश तसेच व्हॅटसॅप व्दरे प्रसिध्दी द्यावी.

९ ) अनोळखी प्रेताची महाराष्ट्र पोलीस गॅझेटमध्ये प्रसिध्दी करावी

१० ) आजुबाजुच्या पोलीस ठाण्यांशी संपर्क साधुन त्यांचे मिसींग रजिस्टरमधील व्यक्तींची पडताळणी करणेबाबत तपासयाद्या पाठवाव्यात.

- घटनास्थळ पंचनामा घडयाळयाच्या काटयाच्या दिशेन अथवा विरूध्द दिशेने करावा.
- घटनास्थळ खुरदळलेला किंवा झटापटीच्या खुना असतील तर त्याचा उल्लेख करावा.
- गुन्हेगारी पार्श्वभुमी असणारे पंच वापरू नयेत.
- घटनास्थळी पडलेल्या वस्तु, दोरी, रक्त, रॉकेलचा कॅन, आगपेटी, चप्पल, विषाची बाटली, पाणी, पाण्यातील शेवाळ, चिखल, इत्यादी किंवा तपासाचे दृष्टीने महत्वाचे वाटणारे भौतिक / वस्तुजन्य पुरावे जप्त करण्यात यावे.
- घटनास्थळाचा नकाशा काढुन घ्यावा.
- उलटीतील पदार्थ, स्टोव्ह, जळालेल्या वस्तु / कपडे, चिठया अशा वस्तु जप्त करण्यात याव्यात.

# अकस्मात मयत संबधी इतर महत्वाच्या बाबी

- जर प्रेत पुरलेले असेल आणि कुत्रे किंवा अन्य प्राण्याने उकरून काढले असल्यसा सदर प्रेताबाबत खात्री करून काही संशयास्पद खबर मिळाली असल्यास त्याबाबत संबधीत मॅजिस्ट्रेत यांनी कळविलेनंतर पुढील कार्यवाही करावी.
- तपास कामी विधीपुर्वक पुरलेले प्रेत बाहेर उकरून काढतांना मॅजिस्ट्रेटची परवानगी घेवुन सीआरपीसी कलम १७५ प्रमाणे कारवाई करावी
- अशा प्रकारात सिआरपीसी कलम १७६ प्रमाणे दंडाधिकारी यांना  स्वता मृत्युच्या करणाची चौकशी करण्याचे अधिकार आहेत.
- प्रेत सडलेले असल्यास वैद्यकीय अधिकारी यांना घटनास्थळावर बोलावुन घेवुन जागीच शवविच्छेदन करून घ्यावे.
- मनवी हाडाचा सांगाडा मिळुन आल्यास पंचनाम्यात तो जप्त करण्यात यावा. व तो तपासणीस पाठविला असल्यास त्याबाबतचा अभिप्राय घेवुन कागदपत्रात सामील करावे.
- जप्त करण्यात आलेला सांगाडा तपासणीसाठी योग्य ती प्रश्नावली तयार करून ब्युरो ऑफ अनॉटॉमी प्रयोगशाहेत पाइविण्यात यावा व त्याची स्थळप्रत कागदपत्रात सामील करावी.
- सुपर इंपोजीशन तंत्राव्दारे कवटीचे मानवी चित्र तयार करून प्रसार माध्यमाव्दारे प्रसिध्दीस द्यावे. आवश्यकता वाटल्यसा डी.एन.ए. टेस्ट करून घ्यावी.

# अकस्मात मयत संबधी इतर महत्वाच्या बाबी

- मयताचे नातेवाईकांची ( आई वडील, भाउ बहिण, बायको, मुले ) यांची तपास टिपणे (जबाब) घेण्यात यावीत.
- मयताचे शेजारी - पाजारी मित्र मैत्रिण, कामाचे ठिकाणी असलेले सहकारी, अनोळखी मृतदेह असल्यास बघणा-या व्यक्तींची आवश्यकतेनुसार तपास टिपणे घ्यावी
- अकस्मात मृत्य संबधी असणारे सर्व फार्म संगणकप्रणालीत वेळच्या वेळी नोंदवावे.
- तपासाबाबत केलेल्या कार्यवाहीच्या सर्व सविस्तर केसडाय-या वेळच्या वेळी तयार कराव्यात.
- अमस्मात मृत्यु मध्ये खुन अथवा इतर घाती मृत्यु असल्याचे निष्पन्न झाल्यास प्रकारानुसार योग्य त्या कलमान्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास करावा.
- गुन्हयाचा प्रकार नसल्यास योग्य मार्फतीने तपासाचा अंतीम अहवाल मा. उपविभागीय दंडाधिकारी यांना सादर करावा.

# धन्यवाद